ठाणे, मंगळवार दि. २१ ऑक्टोबर २०२५ वर्ष : १४, अंक : १७४, पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

लक्ष्मीपूजन

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे




शुभ दीपावली
स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.
आपणांस व आपल्या परिवारास दीपावलीच्या शुभेच्छा !
सौ. नम्रता जयेंद्र कोळी
मा. नगरसेविका (ठा.म.पा.)
श्री. जयेंद्र चिंतामण कोळी
उपाध्यक्ष : भा.ज.पा. ठाणे शहर (जि.)


शुभ दिपावली
लक्ष लक्ष दिव्यांनी
उजळून निघो ही निशा
घेऊनि येवो नवी
उमेद नवी आशा,
सोबत लक्ष
लक्ष शुभेच्छा !
श्री. संजय केळकर
आमदार - ठाणे शहर


लक्ष लक्ष दिव्यांनी
उजळू दे आकाश,
होऊ दे दुष्ट शक्तींचा
विनाश, मिळो सर्वांना
प्रगतीच्या पाऊलवाटेचा
प्रकाश, असा साजरा होवो
आपला सर्वांचा
दिवाळी सण खास...
आपणांस व आपल्या परिवारास
दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा !
शुभ दिवाळी
विकास पाटील
परिवहन समिती सदस्य (ठा.म.पा)

लक्ष्मीपूजन

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

तापमान

बाजार

डोकं खाजवा



बँकेमध्ये पैसा न्यायला येणारी मंडळी कमी होत आहेत. त्यामुळे आपले काय होणार, हीच चिंता मला सतावत आहे

थोडक्यात घडामोडी

### सप्तश्रृंगी देवीचं मंदिर रात्री 12पर्यंत खुलं राहणार

वनी गडावरील सप्तश्रृंगी देवीचं मंदिर दर्शनासाठी रात्री 12वाजेपर्य खुलं राहणार आहे.. 22 ऑक्टोबर ते 6 नोव्हेंबरपर्यंत पहाटे 5 ते रात्री 12 वाजेपर्यंत मंदिर खुलं राहणार आहे.. दिवाळीत भाविकांची गर्दी वाढल्याने मंदिर प्रशासनाने याबाबतचा निर्णय घेतलाय....

## प्रधानमंत्र्यांनी जवानांसोबत साजरी केली दिवाळी









प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सोमवारी, गोव्यातील आयएनएस विक्रांतला भेट दिली. येथील जवानांशी संवाद साधून नौदलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी जवानांना मिठाई भरवली आणि जवानांनी गाणी गाऊन या उत्सवात उत्साह भरला. या दिवाळीला त्यांनी संपूर्ण भारतीयांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी भाषणात ते म्हणाले की, स्वदेशी आयएनएस विक्रांत भारताच्या सैन्य क्षमतेचे प्रतिबिंब आहे. तुमच्या माध्यमातून मी कुटुंबासोबत दिवाळी साजरी करतोय, असे म्हणून जवानांचे मनोबल वाढविले.

# 'शोले'मधील अजरामर जेलर काळाच्या पडद्याआड

मुंबई - ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचं वयाच्या ८४व्या वर्षी निधन झालं असून संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. असरानी यांचं पूर्ण नाव गोवर्धन असरानी असून ते अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होते आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. टीव्ही९च्या रिपोर्टनुसार आज दुपारी ४ वाजता त्यांचे निधन झाले. ५० वर्षांहून अधिक काळ चित्रपटसृष्टीत काम करणाऱ्या काही कलाकारांपैकी असरानी एक होते.

फुफ्फुसांच्या आजारामुळे गेल्या पाच दिवसांपासून असरानी यांना आरोग्य निधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. अभिनेत्याचे मॅनेजर बाबूभाई थिबा यांनी असरानी यांच्या मृत्यूची बातमी सांगितली आणि म्हणाले की, असरानी अनेक दिवसांपासून



आजारी होते आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. संध्याकाळी सांताक्रूझमधील शास्त्री नगर येथे त्यांच्या जवळचे लोक आणि कुटुंबातील सदस्यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### वयाच्या ८४व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

### असरानी यांचं वैयक्तिक आयुष्य

१९७३ मध्ये असरानी यांनी मंजू बन्सलशी लग्न केलं. असरानी यांना एक मुलगा असून त्याचं नाव नवीन असरानी आहे. त्यांचा मुलगा अहमदाबादमध्ये डेन्टिस्ट आहे. असरानी यांचे वडील कार्पेटचं दुकान चालवायचे. त्यांना तीन भाऊ आणि चार बहिणी होत्या.

### असरानी यांचे संस्मरणीय सिनेमे (सविस्तर वृत्त पान 2 वर)

# राज्यातून 2 कोटींचे भेसळयुक्त पदार्थ जप्त

हिंगोली : खाद्यपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्यावतीने राज्यात मोहीम राबविण्यात आली असून, भेसळयुक्त पदार्थांचा तब्बल दोन कोटी रुपयांचा साठा जप्त केला असल्याची माहिती या विभागाने दिली. दिवाळी सणाला सुरुवात झाली असून, या काळात खाद्यपदार्थांत भेसळ करण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाच्यावतीने राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ३५३ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यातील ११६ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली आहे. या मोहिमेत १ कोटी १७ लाख ९३ हजार ४२ रुपये किमतीचा भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला आहे.

### ५४ नमुने प्रयोगशाळेत

तपासणीवेळी सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या खवा, स्वीट



मावा, गायीचे तूप, खाद्यतेल, दूध, पनीर, बटर, वनस्पती तूप, भगर अशा अन्नपदार्थांचे ६५४ नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. त्यापैकी २१६ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून, १९० नमुने प्रमाणित दर्जाचे, ५ कमी दर्जाचे, ८ मिथ्याछाप आणि १३ असुरक्षित नमुने आढळले आहेत.

### शुद्धतेबाबत जागरूकता

अन्नातील भेसळ नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते. (पान 2 वर)



दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
लक्ष्मीपूजन
■ ठाणे, मंगळवार दि. २१ ऑक्टोबर २०२५


# सं[illegible]..



संपादक–चंद्रकांत भोईटे

## [illegible]

जागतिक व्यापाराच्या नकाशावर पुन्हा एकदा नवा तणाव निर्माण झाला आहे. सात वर्षांनंतर पहिल्यांदाच चीनने अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी पूर्णपणे थांबवली आहे. जगातील सर्वात मोठा सोयाबीन आयातदार असलेल्या चीनने अमेरिकेऐवजी ब्राझील आणि अर्जेंटिना या देशांकडून विक्रमी प्रमाणात आयात केली आहे. त्यामुळे अमेरिकेच्या कृषी क्षेत्राला मोठा आर्थिक फटका बसला असून, माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ट्रेड प्रेशर पॉलिसीला चीनने प्रत्यक्षात झटका दिल्याचे दिसत आहे. २०१८ मध्ये सुरू झालेल्या अमेरिका–चीन टॅरिफ वॉरने जगभरात व्यापारसंबंधांच्या धोरणात मोठे बदल घडवले. ट्रम्प प्रशासनाने अमेरिका फर्स्ट या धोरणाअंतर्गत चीनी उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावले, तर चीननेही अमेरिकन कृषी उत्पादनांवर उच्च टॅरिफ लावून प्रत्युत्तर दिले. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांतील व्यापारसंबंध ताणले गेले. मात्र, या संघर्षाचा दीर्घकालीन परिणाम आज दिसत आहे. चीन आता अमेरिकेवरील कृषी अवलंबित्व हळूहळू कमी करत आहे. भारताचीही वेगळी स्थिती नाही. सप्टेंबर २०२५ मधील आकडेवारीनुसार, चीनने १२.८७ मिलियन मेट्रिक टन सोयाबीनची आयात केली. ही आतापर्यंत दुसऱ्या क्रमांकाची मोठी आयात होती, पण त्यात अमेरिकेचा शून्य वाटा होता. यापूर्वी गेल्या वर्षी याच काळात अमेरिकेकडून १.७ मिलियन टन सोयाबीनची आयात झाली होती.

सोयाबीन हे अमेरिकेच्या कृषी निर्यातीतील सर्वात महत्त्वाचे उत्पादन आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा सोयाबीनचा खरेदीदार देश आहे. परंतु अमेरिकेसोबत चाललेल्या टॅरिफ वॉरमुळे सोयाबीनच्या आयातीत घट झाली आहे. काही प्रमाणात जुना साठा अद्यापही मार्केटमध्ये येत आहे. चीन हा अमेरिकन शेतकऱ्यांचा सर्वात मोठा ग्राहक होता. परंतु, टॅरिफ वॉरनंतर चीनने ब्राझील आणि अर्जेंटिनासारख्या देशांकडे वळल्याने अमेरिकन शेतकऱ्यांना अब्जावधी डॉलरचे नुकसान सहन करावे लागत आहे. अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांना अनुदान आणि सबसिडी देऊन हे नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न ट्रम्प प्रशासनाने केला, मात्र या पद्धतीमुळे अमेरिकेतील शेती अर्थव्यवस्था अधिकच अस्थिर झाली आहे. अमेरिकन राजकीय वातावरणातही याचा परिणाम होताना दिसत आहे. शेतकऱ्यांच्या मतदारसंघात ट्रम्प यांच्या कडक व्यापार धोरणांविरुद्ध असंतोष वाढत आहे.

चीनने अमेरिकेचा पर्याय शोधण्याची ही पावले केवळ आर्थिक नव्हे, तर राजनैतिक दृष्टीनेही महत्त्वाची आहेत. ब्राझील आणि अर्जेंटिना यांच्याशी वाढते व्यापारसंबंध चीनला दक्षिण अमेरिकेत प्रभाव वाढवण्यास मदत करत आहेत. सप्टेंबर महिन्यात ब्राझीलकडून आयात २९.९ टक्के वाढून १०.९६ मिलियन टन झाली, तर अर्जेंटिनाकडून आयात तब्बल ९१.५ टक्के वाढून १.१७ मिलियन टन झाली. यातून चीनने दोन स्पष्ट संदेश दिले आहेत. पहिला संदेश हा आहे की, अमेरिका आता त्याच्या कृषीपुरवठा साखळीत अनिवार्य नाही. दूसरा संदेश असा की, ट्रेड प्रेशर किंवा धमक्यांना चीन आता प्रतिसाद देणार नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या कारकिर्दीत अमेरिकेचे हित सर्वोच्च ठेवत सर्व देशांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारतालाही रशियाशी तेल व्यापार थांबवण्यासाठी दबाव टाकण्यात आला होता. मात्र भारताने तो दबाव नाकारला आणि रशियाकडून स्वस्त तेल खरेदी सुरूच ठेवली. आता चीनच्या भूमिकेमुळे ट्रम्प यांच्या धोरणात्मक दबावाची मर्यादा जगासमोर आली आहे. आशियाई देश विशेषतः चीन, भारत, इंडोनेशिया आणि मलेशिया हे आता अमेरिकेच्या हकुमशाही धोरणांना झुकत नाहीत, असा स्पष्ट संदेश या घटनाक्रमातून गेला आहे. चीनच्या या निर्णयाचा परिणाम केवळ अमेरिकेवरच नाही, तर जागतिक कृषी बाजारावरही झाला आहे. सोयाबीनच्या किमतीत अस्थिरता वाढली आहे. ब्राझील आणि अर्जेंटिनातील शेतकऱ्यांना याचा थेट फायदा झाला असून त्यांच्या निर्यातीला विक्रमी वेग आला आहे. उलटपक्षी, अमेरिकन बंदरांवरील सोयाबीन साठे वाढले आहेत, तर निर्यात आकडेवारी घसरली आहे.

बीजिंगस्थित कृषी तज्ज्ञ जॉनी जियांग यांनी इशारा दिला आहे की, जर अमेरिका आणि चीन यांच्यात नजीकच्या काळात कोणताही व्यापार करार झाला नाही, तर फेब्रुवारी–एप्रिल २०२६ मध्ये चीनमध्ये सोयाबीन पुरवठा संकट निर्माण होऊ शकतो. त्यामुळे निकट भविष्यात या दोन महाशक्तींच्या व्यापारी चर्चांना पुन्हा वेग मिळण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या दबाव धोरणांमुळे अनेक देश स्वतंत्र व्यापारमार्ग शोधत आहेत. ब्रिक्स संघटना आणि आरसीईपीसारख्या प्रादेशिक व्यापार करारांतून चीन, भारत, रशिया, ब्राझील, दक्षिण आफ्रिका हे देश स्वतःचे व्यापारमंच मजबूत करत आहेत. अशा परिस्थितीत, अमेरिका आपला जागतिक आर्थिक वर्चस्व टिकवण्यासाठी नव्या धोरणांची आखणी करेलच. मात्र, चीनसारख्या देशांनी अमेरिकेच्या आर्थिक दबावाला प्रत्युत्तर देण्याची ही नवी शैली आता इतर देशांसाठीही आदर्श ठरू शकते. चीनने अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी थांबवून दाखवले आहे की, जग आता एका देशाच्या आर्थिक हुकुमशाहीखाली वागणार नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार हे परस्परावलंबित्वावर चालते; एकतर्फी धमक्या आणि टॅरिफ युद्धाने कोणालाही दीर्घकालीन फायदा होत नाही, हे या घटनेने पुन्हा सिद्ध केले आहे. अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांसाठी ही परिस्थिती एक परीक्षा आहे. आर्थिक शहाणपण आणि कूटनीतिक परिपक्वतेच्या कसोटीवर जगाचे लक्ष आता पुन्हा या दोन महासत्तांकडे वळले आहे.





ठाण्यातील पांचपाखाडी - गणेशवाडी येथील श्री तुळजाभवानी मंदिरात दिपावलीनिमित्त महाविकास आघाडीच्या वतीने 'दीपोत्सव' आयोजित करण्यात आला होता. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड, शिवसेना नेते राजन विचारे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, मनसेचे ठाणे - पालघर अध्यक्ष अविनाश जाधव, शिवसेना- उबाठा जिल्हाप्रमुख केदार दिघे, मनसेचे शहराध्यक्ष रवींद्र मोरे आदी.. चारही पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# महापालिका निवडणुकांपूर्वी एकनाथ शिंदेंचे विरोधकांना थेट चॅलेंज, मोठा बॉम्ब फोडणार



मुंबई - राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध ठिकाणी आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमांना हजेरी लावताना दिसत आहेत. यावेळी ते जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देताना पाहायला मिळत आहे. आता दिवाळी पहाटच्या कार्यक्रमानिमित्ताने एकनाथ शिंदे यांनी सगळ्यांची दिवाळी गोड, आनंदी, सुखाची, समृद्धीची आणि आरोग्यदायी जावो, अशा शुभेच्छा सर्व नागरिकांना दिल्या. शिवसेना आणि जिजाऊ संस्थेच्यावतीने निलेश सांबरे यांनी आयोजित केलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाला त्यांनी भेट दिली. आता दुपार झाली असली तरी, दिवाळी पहाटच्या निमित्ताने सगळीकडे जो उत्साह आणि जल्लोष दिसून येत आहे, तो आनंददायी आहे. सगळ्यांची दिवाळी गोड, आनंदी, सुखाची, समृद्धीची आणि आरोग्यदायी जावो," असे एकनाथ शिंदे म्हणाले.

ठाणेमध्ये फिरत असताना प्रचंड उत्साह, जोश आणि जल्लोष पाहायला मिळाला. तरुणाई ओसंडून वाहत होती. धर्मवीर आनंद दिघे यांनी ठाण्यात उत्सवाला सुरुवात केली. प्रत्येक सण साजरा झाला पाहिजे. सगळे लोक एकत्र आले पाहिजे, ही भावना ठेऊन कार्यक्रम केले जातात. ठाण्याला सणांचे आगळं-वेगळं महत्त्व आहे."

### ठाण्याला उत्सवाच्या पंढरीचे स्वरूप

ठाणेकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना शिंदे म्हणाले, मला आनंद आणि समाधान आहे की ठाणेकरांनी मला मोठा केला. त्यांच्या आशीर्वादामुळे मी मुख्यमंत्री झालो आणि आता उपमुख्यमंत्री आहे. त्यांचे आशीर्वाद माझ्यामागे आहेत. आज बाळासाहेब आणि आनंद दिघे यांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. हे सण-उत्सव त्यांनी वाढवले आणि ठाण्याला उत्सवाच्या पंढरीचे स्वरूप दिले आहे."

राज्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीवर भाष्य करताना त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. शेतकरी संकटात आहे. बळीराजाच्या डोळ्यात अश्रू होते. आम्ही बांधावर गेलो आणि शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, असे सांगितले. नुकसान भरपाईपोटी महायुतीने मदत जाहीर केली आहे. या मदतीसाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानतो, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### महायुतीचा आयटम बॉम्ब फुटल्याशिवाय राहणार नाही...

यावेळी एकनाथ शिंदेंनी राजकीय विरोधकांवर हल्लाबोल केला. गेल्या वेळी मी इथेच बोललो होतो की विधानसभेत लँडस्लाईड मतदान होईल आणि निवडून येऊ आणि येणाऱ्या महापालिका निवडणुकीत देखील तेच होणार आहे. गेल्या काही दिवसात हे लोक बोलत होते की निवडणूक घ्या, पण आता ते घाबरत आहेत म्हणून निवडणुका पुढे ढकला असं सांगत आहेत. जेव्हा पराभव दिसतो तेव्हा निवडणूक आयोगाकडे तक्रार करतात. हा त्यांचा रोजचा धंदा झाला आहे. या लोकांनी कितीही लवंगी बॉम्ब फोडला तरीसुद्धा आता महायुतीचा आयटम बॉम्ब फुटल्याशिवाय राहणार नाही," असे एकनाथ शिंदे म्हणाले.

लोकांचा मन वळवत आहेत आणि स्वतःची हार लपवण्यासाठी ते हे सगळं काम करत आहेत. त्यांचा विजय झाला तर सगळं ईव्हीएम योग्य आणि आता अयोग्य झाला. पण काहीही झालं तरी विजय हा महायुतीचाच होणार आहे, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले.

# मनोमिलन नाटकाचं जोरदार प्रमोशन सुरु, एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंसह उद्धव ठाकरेंना टोला

मुंबई - गेल्या काही दिवसापासून उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) आणि राज ठाकरे (Raj Thackeray) या दोन बंधूमध्ये जवळीक वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या तीन चार महिन्यात ठाकरे बंधू सात वेळा एकत्र आले आहेत. त्यामुळं आगामी महापालिकेच्या निवडणुकीत दोन्ही ठाकरे एकत्र लढणार असल्याची चर्चा सुरु आहे. याच मुद्यावरुन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांनी टोला लगावला आहे. मनोमिलन नाटकाचं जोरदार प्रमोशन सुरु असल्याचा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरेंसह उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

### उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे सातत्याने एकत्र येत आहेत

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे सातत्याने एकत्र येत आहेत. शिवाय आगामी मुंबई महापालिका निवडणुका दोघे एकत्र लढण्याची फक्त औपचारिक घोषणा बाकी आहे. मात्र यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टोला लगावला. पूर्वी भाऊ बंधकी नाटक गाजलं होतं, मात्र आता मनोमिलन नाटकाचं जोरदार प्रमोशन सुरू असल्याचा टोला राज आणि उद्धव ठाकरेंना लगावला.

### निवडणुका लवकर घ्या असं म्हणत होते, आता पराभव दिसू लागल्यामुळं निवडणुका पुढे ढकला म्हणतात

निवडणुका लवकर घ्या असं म्हणत होते आता त्यांना पराभव दिसू लागला त्यामुळे निवडणुका पुढे ढकला असे म्हणत असल्याचा टोला त्यांनी लावला आहे. अशोक मामाचं एक नाटक होत सारख छातीत दुखतंय मामांना मी सांगू इच्छितो शिवसेनेचे यश पाहून काही लोकांच्या छातीत सारख दुखतंय. अंबरनाथमध्ये धर्मावर आनंद दिघे नाट्यगृहाचे लोकार्पण एकनाथ शिंदे, अभिनेते अशोक सराफ यांच्याहस्ते पार पडले, यावेळी ते बोलत होते.

शुक्रवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शिवाजी पार्करवर दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या दिपोत्सवानिमित्त राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले होते. शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दिपोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले होते . यावेळी राज ठाकरे यांचे संपूर्ण कुटुंबीय आणि उद्धव ठाकरे यांचे सर्व कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरेंनी समोर उपस्थित असलेल्या सर्वांना मार्गदर्शन केलं. सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मराठी माणसांची एकजूट आणि त्या एकजूटीचा प्रकाश सर्वांच्या आयुष्यात आनंद घेऊन आल्याशिवाय राहणार नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले होते.





■ ठाणे महानगरपालिकाच्या वतीने हाइड पार्कच्या समोर, राजमाता जिजाऊ उद्यान (ऑक्सिजन पार्क),चे उदघाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाहस्ते दीपावलीच्या दिवशी करण्यात आले यावेळी महापालिका आयुक्त सौरभ राव , खासदार नरेश म्हस्के आदी मान्यवर उपस्तित होते. (छाया - मनोज सिंह)

# असरानी यांचे संस्मरणीय सिनेमे

**(पान 1 वरून )** असरानी यांच्या अकाली निधनानं चाहते आणि कलाकारांनाही धक्का बसला आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक चित्रपटांमध्ये काम केलंय. असरानी यांचा जन्म १ जानेवारी १९४१ रोजी जयपूर येथे झाला. त्यांनी जयपूरमधील सेंट झेवियर्स स्कूलमध्ये शिक्षण घेतलं आणि नंतर राजस्थान कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. १९६७ मध्ये 'हरे कांच की चुडियाँ' या चित्रपटाद्वारे असरानी यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिलं नाही. असरानींच्या सर्वात संस्मरणीय भूमिकांपैकी, 'शोले' चित्रपटातील जेलरची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या चित्रपटातील त्यांचा डायलॉग, 'हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं' खूप प्रसिद्ध झाला आणि दशकांनंतरही लोक अजूनही या डायलॉगसाठी असरानींना ओळखतात.

# राज्यातून 2 कोटींचे भेसळयुक्त पदार्थ जप्त

**(पान 1 वरून )** त्यामुळे अन्नपदार्थांची खरेदी करताना उत्पादकाचे नाव, उत्पादन दिनांक, 'एफएसएसएआय' परवाना क्रमांक आणि शुद्धतेची खात्री करणे गरजेचे आहे. ग्राहकांनी शुद्धतेबाबत जागरूक राहणे हेच 'सण सुरक्षिततेचा' खरा संकल्प असल्याचेही प्रशासनाने नमूद केले.

**अभियानांतर्गत कारवाई -** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली 'सण महाराष्ट्राचा संकल्प अन्न सुरक्षितते'चा या अभियानांतर्गत राज्यभरात ही तपासणी मोहीम राबविण्यात आली. सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि शुद्ध अन्न मिळावे, तसेच बाजारात विक्री होणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये भेसळ होऊ नये, उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली, असे अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) स्पष्ट केले. सणासुदीच्या काळात अन्नातील भेसळीबाबत नागरिकांना शंका आल्यास त्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा किंवा नजीकच्या अन्न व औषध प्रशासन कार्यालयात तक्रार नोंदवावी. - सुरेश अन्नपुरे, सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन.

# पनवेलमध्ये शिवसेना उबाठा गटाला हादरा; पालीमधील उबाठा गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

पनवेल - नागरिकांची सेवा करून त्यांच्या समस्या सोडवण्याचा दृष्टिकोन ठेवून काम केले, तर आपली ताकद अधिक दृढ होईल, असे प्रतिपादन लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. पनवेल तालुक्यातील वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीमधील पाली गावातील शिवसेना उबाठा गटातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी त्यांनी सर्व नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून होत असलेला विकास आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षांतील अनेक पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर वांगणी विभागातील वाजे ग्रामपंचायत हद्दीतील पाली गावातील शिवसेना उबाठा गटाचे ग्रामपंचायत सदस्य चिंतामणी शेळके यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.



हा कार्यक्रम पनवेल मार्केट यार्ड येथील रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, भाजप युवामोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, चाहुशेठ म्हात्रे, गुरुनाथ भोईर, प्रविण म्हात्रे, भाजपचे तालुका चिटणीस यतिन पाटील, सतीश शेळके, सतीश मालुसरे, अरुण जळे, महेंद्र भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

पक्षप्रवेशाच्या वेळी आमदार ठाकूर आणि उपस्थित मान्यवरांनी सर्व नवागत कार्यकर्त्यांचे पक्षाच्या शालीने स्वागत केले. यावेळी नयना शेळके, हरेश शेळके, स्वाती शेळके, महेश शेळके, चित्रा शेळके, सुभाष शेळके, भरत भोईर, रेखा भोईर, बारक्या शेळके, हनुमान शेळके, नितीन शेळके, भगवान शेळके, मच्छिंद्र शेळके, शाम शेळके, राम शेळके, जानवी शेळके, अजय शेळके, गुलाब शेळके, वैशाली शेळके, स्वस्तिका शेळके, वैजंती शेळके, संतोष शेळके, प्रशांत भोईर, बारकी शेळके, कुणाल शेळके, इंद्राबाई शेळके, निलम भोईर यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.




ठाण्यातील मासुंदा तलाव तसेच राममारुती रोड परिसरामध्ये दिवाळी पहाट निमित्त युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती या ठिकाणी युवा सेना आणि शिवसेनेच्या वतीने युवा जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार भाजप आमदार संजय केळकर, कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहून युवकांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना युवा सेनेचे नितीन लांडगे, अभिषेक शिंदे , निखिल बुडजडे, निखिल वाढेकर , कार्यकर्ते पदाधिकारी तरुण तरुणी मोठ्या संख्यने या दिवाळी पहाट चे आनंद घेतले. - छाया, मनोज सिंह

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले

# राजमाता जिजाऊ उद्यानाचे लोकार्पण

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, आयुक्त सौरभ राव यांची उपस्थिती

ठाणे (गणेश भोईटे) : ठाण्यात विविध संकल्पनांवर आधारित उद्यानांचा विकास करण्यात येत आहे. त्यापैकीच एक अशा राजमाता जिजाऊ उद्यान म्हणजेच ऑक्सिजन पार्कचे आज लोकार्पण करण्यात येत आहे. लवकरच कळवा येथे नक्षत्र उद्यान विकसित केले जाईल. एकेक संकल्पना घेऊन विकसित होत असलेल्या या उद्यानांसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात दिली.



“ मानपाडा येथील हाईड पार्कसमोर असलेल्या राजमाता जिजाऊ उद्यानाचे लोकार्पण सोमवारी दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते. लोकार्पण केल्यावर सर्व मान्यवरांनी या उद्यानात फिरून तेथील झाडे, औषधी वनस्पती, नागरिकांसाठी असलेल्या सुविधा यांची पाहणी केली.

*“ रस्त्यावरून या उद्यानाच्या आत आल्यावर आपल्याला हवेतील फरक स्पष्टपणे जाणवतो. इथल्या औषधी वनस्पतींचे गुणधर्म ऐकल्यावर व्याधीमुक्त होण्यासाठी या उद्यानाची सैर आवश्यक असल्याचे लक्षात येते. व्याधीमुक्त होण्यासाठी या ऑक्सिजन पार्कची नागरिकांना मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पावसाचे बदलेले वेळापत्रक आपण पाहतो आहोत. मराठवाड्यात तर अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडलेला आहे. त्याला राज्य सरकारने मदतीचा हात दिला आहे. त्याला दिलासा देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. आपण शहरातील नागरिकांनीही याची जाणीव ठेवली पाहिजे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.*

## उद्यानाविषयी माहिती

- ठाणे महानगरपालिका वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत हिरानंदानी मेडोज परिसरात साडेतीन एकर क्षेत्रफळात राजमाता जिजाऊ उद्यान आहे.
- या उद्यानाची निर्मिती महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत एकात्मिक उद्यान विकास कार्यक्रमाअंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विकसित करणेकरिता शासनाकडील प्राप्त निधीतून करण्यात आली आहे.
- उद्यानात दुर्मिळ वृक्ष तसेच गुडमार, अडुळसा, हळद, सिट्रोनेला, डिकेमाली, कापूर, बारतोंडी, अंबाडा, गोकर्ण, जायफळ, दमवेल, आपटा, बेल, रुद्राक्ष, शेर, भद्राक्ष, निरगुडी, गुळवेल इ. सारख्या औषधी वनस्पती व शोभिवंत फुलझाडे यांच्या १०० हून अधिक प्रजातींची एकूण १५००० झाडांची लागवड करण्यात आलेली आहे.
- औषधी वनस्पतींच्या लागवडीसह आयुर्वेदाची देवता धन्वंतरी तसेच आयुर्वेदाचे जनक आचार्य चरक व आचार्य सुश्रुत यांचेही शिल्प उभारण्यात आलेले आहे.
- तसेच या ठिकाणी कृत्रिम तलावदेखील साकारण्यात आला असून यात विविध जल वनस्पतींची लागवड करण्यात आलेली आहे.
- येथील बहुतांश झाडांना क्यू आर कोडसह माहिती फलक लावण्यात आले आहेत व त्या क्यू आर कोडला स्कॅन करुन नागरिकांस झाडांबाबत माहिती मिळेल.
- या उद्यानाचा एक फेरफटका मारल्यास सुमारे ५०० मीटर अंतर पार होणार असून त्याकरिता टप्याटप्याने विशिष्ट अंतरावर फलक लावण्यात आलेले आहेत.
- पक्ष्यांना त्रास होणार नाही अशा पध्दतीने विद्युत दिव्यांची सोयही करण्यात आलेली आहे.
- उद्यान साकारताना तेथील प्राचीन वड व पिंपळ वृक्षांचे संवर्धन व सुशोभिकरण करण्यात आले आहे.
- या उद्यानात अधिकाधिक ऑक्सिजन निर्मितीकरिता सघन पध्दतीने ५०० हून अधिक बांबूची लागवड करण्यात आलेली आहे.

*ठाणे शहर बदलतेय. डिसेंबरपर्यंत मेट्रोचा पहिला टप्पा सुरू होईल. रस्ते रुंद होत आहेत, रिंग मेट्रोचे काम सुरू झाले आहे. मुक्त मार्ग, भुयारी मार्ग या प्रकल्पांमुळे विकसित ठाणे, हरित ठाणे अशी शहराची ओळख निर्माण होते आहे. ठाण्यात कावेसर, लोकमान्य नगर, नागला बंदर आदी ठिकाणी अर्बन फॉरेस्ट निर्माण करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात गेल्यावर्षी सव्वा लाख झाडे लावण्यात आली. यंदा ते लक्ष्य दोन लाखांचे होते. तेही पूर्ण करून दोन लाख ०९ हजार झाडे लावून झाली आहेत. त्यांची वाढही होते आहे. त्यामुळेच ठाणे वरून पाहताना हिरवेगार दिसते आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. त्याचबरोबर, आणखी ऑक्सिजन पार्क तयार करावीत. तसेच, महापालिकेच्या शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्याने दोन झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, अशी सूचनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. तसेच, एक आव्हान म्हणून या उद्यानाचे काम ठाणे महापालिकेचे उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी हाती घेतले आणि ते पूर्ण केले त्याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या सोहळ्याचे प्रास्ताविक करताना, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी राजमाता जिजाऊ उद्यानाची माहिती दिली. येथे चार-पाच दिवसांपूर्वी लावलेल्या रोपट्यापासून १०० वर्षे जुना वृक्ष आहे. साडेतीन एकर जागेत नवीन संकल्पनेसह हे उद्यान साकारले आहे. २७ ऑगस्ट रोजी मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या उद्यानाचा नव्याने विकास करण्याचे निर्देश दिले होते. त्यासाठी त्यांची चार कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला. आज त्याचे लोकार्पण होत आहे, ही मनाला समाधान देणारी गोष्ट असल्याचे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी केले. ठाणेकरांना विविध प्रकारच्या समस्या त्रास देत आहेत. आम्ही त्यातील एकेका समस्येवर तोडगा काढण्याचे प्रयत्न करतो आहोत, असेही राव म्हणाले.*

*याप्रसंगी, उद्यान अधिक्षक केदार पाटील, रचनाकार प्रणव अनायल आणि जुईली मांजरेकर, वृक्ष मित्र आनंद पाटील यांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सोहळ्यास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*




ठाणे शहरातील जय भवानीनगर वागळे इस्टेट परिसरातील स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे उद्यानाचे सुशोभीकरण सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला वागळे इस्टेट परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास खासदार नरेश मस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, शिवसेना सचिव राम रेपाळे, स्थानिक माजी नगरसेवक एकनाथ भोईर, माजी नगरसेविका एकता भोईर, तसेच शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते. माजी नगरसेवक एकनाथ भोईर व माजी नगरसेविका एकता एकनाथ भोईर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या उद्यानाचे सुशोभीकरण पूर्णत्वास गेले आहे. उद्यानात महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी ओपन जिम, लहान मुलांसाठी विविध आकर्षक खेळणी, नागरिकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणारा आरो प्लांट, तसेच भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी हिरवाईने नटलेले हे उद्यान नव्या ठाण्याचे आकर्षण ठरणार असून, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर या उद्घाटनाने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. (छाया, मनोज सिंह)

# लक्ष्मीपूजनानिमित्त झेंडूंच्या फुलांनी सजल्या बाजारपेठा

## कमळाच्या फुलांना मोठी मागणी

वसई : लक्ष्मीपूजनानिमित्त वसई विरारच्या बाजारपेठा झेंडूच्या फुलांनी बहरून गेल्या आहेत. पावसामुळे जरी झेंडूच्या फुलांची आवक घटली असली तरी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर जुन्या आणि नव्या अशा दोन्ही प्रकारच्या झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असल्याचे दिसून येत आहे.

***सजावटीसाठी हलक्या दर्जाच्या फुलांची खरेदी***

*दिवाळीनिमित्त फुलांच्या पाकळ्या वापरून घरातील अंगण, उंबरठे सजवले जातात. तर काही वेळा रांगोळी काढण्यासाठी देखील फुलांच्या पाकळ्यांचा वापर होतो. पण यंदा बाजारात झेंडूच्या फुलांची आवक घटल्याने आणि किंमती चढ्या असल्यामुळे खरेदीदारांकडून अर्ध्या किंमतीत उपलब्ध असणाऱ्या हलक्या दर्जाच्या फुलांची खरेदी अशा प्रकारच्या सजावटीसाठी केली जात आहे.*

***कमळ फुलांचे दर वाढले***

*लक्ष्मीच्या पूजेदरम्यान कमळाच्या फुलाचा आवर्जून वापर केला जातो, कारण कमळ हे लक्ष्मीला प्रिय आहे. या फुलाचा पूजेत वापर करण्याला विशेष महत्त्व आहे. यामुळे घरात धन आणि समृद्धी येते असे मानले जाते. देवी लक्ष्मीला कमळाचे फूल आवडते. ती कमळाच्या फुलात वास करते तसंच ते तिचे आसनदेखील आहे. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी कमळाच्या फुलाला मोठी मागणी असते. त्यामुळे कमळांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. एक गुलाबी कमळ शंभर रुपयांनी तर तीस रुपये दराने पांढऱ्या कमळांची विक्री केली जात आहे.*

मंगळवारी मोठ्या उत्साहात लक्ष्मीपूजन साजरे केले जाणार आहे. तर सोमवार सकाळपासूनच वसई विरारमधील बाजारपेठांमध्ये लक्ष्मीपूजनासाठी लागणाऱ्या पूजा साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. पूजेच्या इतर साहित्याच्या तुलनेने बाजारात फुलांची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून आले. यातही प्रामुख्याने झेंडूची फुले, हार, तोरण आणि माळांच्या खरेदीकडे नागरिकांचा कल अधिक असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये दीपोत्सव उत्साहात



पनवेल : मिडलक्लास हौसिंग सोसायटी ही विविध उपक्रमांचे केंद्र बनत आहेत, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर दीपोत्सवाच्या उदघाटनावेळी काढले. दिवाळीच्या मंगलमय स्वागतासाठी पनवेलमधील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने दीपोत्सव 2025 या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी केले होते. पनवेलकरांसाठी हा सोहळा मनोरंजन, इतिहास आणि समाज एकात्मतेचा सुंदर संगम ठरला.

“ या दिमाखदार कार्यक्रमाचा शुभारंभ डॉक्टर सुहास हळदीपूरकर यांच्या हस्ते आणि पनवेल मतदार संघाचे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थिती झाला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही भेट देऊन आयोजकांना व उपस्थितांना शुभेच्छा देऊन प्रसिद्ध वक्ते सुदर्शन शिंदे यांच्या व्यख्यानाचे कौतुक केले तसेच त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दीपोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते, नेत्रदीपक आकर्षक फायरवर्क्स आणि लाईट शो. या रोषणाईने संपूर्ण परिसर उजळून निघाला आणि दिवाळीच्या उत्साहाला एक खास रंगत आली. विविध रंगांच्या आणि आकारांच्या दिव्यांची सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे एक मनमोहक आणि उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले होते.

सांस्कृतिक मनोरंजनासोबतच वैचारिक मेजवानी देण्यासाठी कार्यक्रमात शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध वक्ते सुदर्शन शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि गडकोट या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवरायांचे पराक्रम, त्यांचे गडकोट व्यवस्थापन आणि त्यातून मिळणारी प्रेरणा यावर त्यांनी विचार मांडले. या व्याख्यानाने उपस्थितांना गौरवशाली स्मृतींचा अनुभव मिळाला. या यशस्वी आयोजनामागे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, एम.सी.सी.एच. सोसायटीचे अध्यक्ष आणि उद्योजक राजु गुप्ते, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा भाजपचे पनवेल शहरध्यक्ष सुमित झुंजारराव यांची अथक मेहनत होती. दीपोत्सवाच्या निमित्ताने पनवेलकरांना दिवाळीच्या आनंदासोबतच इतिहास आणि समाज एकात्मतेची भावना अनुभवण्याची अनोखी संधी मिळाली.

या कार्यक्रमाला भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, डॉक्टर सुहास हळदीपूरकर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपनेते जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, डॉ. सुरेखा मोहोकर, अनुराधा ठोकळ, रुचिता लोंढे, सारिका भगत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव उद्योगपती राजू गुप्ते, विलास कोठारी, मंगेश परुळेकर, मिलिंद पोटे, शहर उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, प्रभाग क्रमांक अध्यक्ष पवन सोनी, संजय जैन, प्रशांत शेटे, प्रवीण मोरबाळे, यांच्यासह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेपाळमधूनही होते अमली पदार्थांची तस्करी; दोन जणांना अटक, ३७ लाखांचे अमली पदार्थ जप्त

वसई : वसई विरारमध्ये पाकिस्तान पाठोपाठ आता नेपाळ येथील सीमेलगत भागातूनही अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. नुकताच वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून त्यांच्या कडून ३७ लाख ५१ हजार रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

८ ऑक्टोबरला वसई पूर्वेकडील खैरपाडा येथे एक इसम राहत्या घरातुन चरस अंमली पदार्थ विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी पथक तयार करून छापा टाकून इरफान सुलेमान खत्री (७०) याला ताब्यात घेतले त्याच्याकडे १ किलो ८८ ग्रॅम वजनाचा चरस अंमली पदार्थ, मोबाईल, रोख रक्कम असा एकुण १६ लाख ३७ हजार ८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर ही पोलिसांचा तपास सुरू होता.याच दरम्यान मुख्य आरोपी तबरेज अमीन मियान खान (२५) याला ही पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून १ हजार ३८६ ग्रॅम वजनाचा चरस अंमली पदार्थ व १ हजार ५० ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ, रोख रक्कम, मोबाईल असा मुदेमाल जप्त केला. दोन्ही आरोपीताकडुन ३७ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# दिवाळी पहाटमधील सुरांच्या मैफीलीत राजकीय पक्षांचे शक्तीप्रदर्शन

पनवेल : महापालिका निवडणूकीला अजून काही महिन्यांचा अवकाश असताना कळंबोली उपनगरातील प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांसाठी दिवाळी सणानिमित्त आयोजित दिवाळी पहाट या सुरेल कार्यक्रमांचे दोन वेगवेगळ्या ठिकाणी आयोजन केल्यामुळे प्रेक्षकांना कोणत्या सूरेल मैफीलीसाठी जाऊ असा प्रश्न पडला होता. सूरेल कार्यक्रमांच्या आडून मतदारांना आपल्याच कार्यक्रमाच्या मंडपापर्यंत आणण्यासाठी भाजप आणि महाविकास आघाडीतील घटकपक्षांच्या पदाधिका-यांची यानिमित्ताने स्पर्धा पाहायला मिळाली. या स्पर्धेत सर्वाधिक महिलावर्गाची उपस्थिती भाजप आयोजित कार्यक्रमासाठी लागल्याचे दिसले.

दरवर्षी प्रमाणे यंदा सुद्धा दिवाळी सणापूर्वी सर्वसामान्यांच्या घरापर्यंत उटण्याची पाकीट वाटण्यासाठी राजकीय महत्वाकांक्षा असणा-या व्यक्तींनी पनवेलमधील अनेक प्रभागात मतदारांपर्यंत पोहचण्याचा हा प्रयत्न केल्याचे पाहायला मिळाले. भारतीय जनता पक्षाने पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे आणि खारघर या उपनगरांमध्ये दिवाळी संध्या आणि दिवाळी पहाट असे कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

भाजपचे माजी नगरसेवक बबन मुकादम तसेच भाजपच्या उत्तर जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्ष प्रिया मुकादम यांनी कळंबोली येथील सेक्टर ६ मधील साईनगर सोसायटीजवळच्या सिडको उद्यानात दिवाळी पहाटचा कार्यक्रम आयोजित केला होता. भाजपाने या कार्यक्रमाच्या आयोजनाचे फलक जागोजागी उपनगरात लावल्यानंतर तीन राजकीय पक्षांच्या महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व तुषारदादा पाटील युवामंच यांनी पुढाकार घेऊन सेक्टर ५ येथील हिंदुस्थान बँकेशेजारील मोकळ्या जागेवर दिवाळी पहाटचा कार्यक्रमाचे आयोजन केले.एकाच रस्त्यावरील काही अंतरावर असणा-या या दोनपैकी कोणत्या कार्यक्रमातील सूर ऐकायचे असा पर्याय निवडण्याची संधी कळंबोलीतील नागरिकांना पहिल्यांदा मिळाली. भाजपच्या कार्यक्रमात एकसारख्या दिसणा-या साड्या नेसून आलेल्या महिलावर्गाने सर्वांचे लक्ष्य वेधले होते. तसेच दोन्ही पहाटेच्या कार्यक्रमांमध्ये सूरेल गीत ऐकण्यासाठी अभ्यंगस्नान करून आलेल्या महिलांसोबत पुरुष वर्गाची संख्या मोठी होती. कळंबोली येथील प्रभाग ८ हा उपनगरातील सर्वात महत्वाचा प्रभाग आहे.

क्रमांक मावज/दिपावली/२०२५-२६/का-५/२१५



# कुणीही आपण सरकार असल्याच्या थाटात वागू नये

## शनिवार वाड्याबाहेरच्या राड्यावरुन नीलम गोऱ्हेंचा मेधा कुलकर्णींना टोला

शनिवार वाडा ही पुरातत्व विभागाने संरक्षित केलेली वास्तू आहे. त्याचे काही नियम आहे. या नियमांचे पालन झाले पाहिजे. शनिवार वाड्याच्या परिसरात पुरातत्व विभागाचे काही नियम मोडले असतील तर राज्य सरकार आहे, पोलीस आयुक्त आहेत, जिल्हाधिकारी अस्तित्वात आहेत. त्यामुळे इतर कोणीही आपण सरकार आहोत, या थाटात वागू नये, असा टोला विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांना लगावला.

पुण्यातील शनिवार वाड्यात काही मुस्लीम महिलांनी नमाज पठण केल्याचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यावरुन रविवारी शनिवार वाड्याबाहेर खासदार मेधा कुलकर्णी आणि पतित पावन संघटनेने जोरदार निदर्शन केली होती. मेधा कुलकर्णी यांनी शनिवार वाड्याच्या आत जाऊन नमाज पठण झालेल्या ठिकाणावर शिववंदना करण्याचा आग्रह धरला होता. तसेच आम्हाला त्याठिकाणी गोमूत्र शिंपडायचे असल्याचा हट्टही मेधा कुलकर्णी यांनी धरला होता. मात्र, पोलिसांनी त्यांना मज्जाव केल्याने मेधा कुलकर्णी प्रचंड आक्रमक झाल्या होत्या. या सगळ्या पार्श्वभूमीवर नीलम गोऱ्हे यांनी मेधा कुलकर्णी यांना, 'आपण स्वत: सरकार आहोत, या थाटात वागू नये', असा टोला नीलम गोऱ्हे यांनी लगावला. त्या सोमवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

शनिवार वाड्यातील घटनेबाबत प्रशासन काय भूमिका घेते, हे महत्त्वाचे आहे. याठिकाणी महिलांनी नमाज पठण केले असेल तर त्यांनीही संयम बाळाला पाहिजे होता. उद्या कोणीही म्हणेल की आम्ही मशिदीत जाऊन कीर्तन करु, पण म्हणून तसं होणार नाही. शनिवार वाडा ही पुरातत्व विभागाने संरक्षित केलेली वास्तू आहे. त्याचे काही नियम आहे त्याचा पालन झाले पाहिजे, असे नीलम गोऱ्हे यांनी म्हटले.

यावेळी नीलम गोऱ्हे यांनी महायुतीलमधील अंतर्गत वादाच्या मुद्द्यावरही भाष्य केले. युती आहे म्हणून कोणीच काही मुद्दा मांडायचा नाही असं तर कधी म्हणणार नाही. आमच्या मंत्र्यांबद्दलही अनेक जण प्रश्न विचारत आहेत. लोकशाहीमध्ये असे प्रश्न विचारले तर ताबडतोब असं कोणी आमच्या विरोधात बोलूच नये हे योग्य नाही, असेही नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. यावेळी नीलम गोऱ्हे यांनी मुरलीधर मोहोळ यांच्यासह भाजपच्या नेत्यांवर टीका केली. रविंद्र धंगेकर आमच्या पक्षाचे नेते आहेत. त्यांना वस्तुस्थिती माहित असेल म्हणून ते बोलत असतील. हेतू ठेवून आरोप करण्यापेक्षा वस्तुस्थितीतून जनतेवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असेही नीलम गोऱ्हे यांनी म्हटले.

# 'शनिवार वाडा मेधा कुलकर्णींच्या पप्पांचा नाही'; शनिवारवाड्यातून रुपाली पाटलांचा मेधा कुलकर्णींवर जोरदार हल्लाबोल

पुणे : पुण्यातील शनिवारवाडा परसिरात काही अज्ञात महिलांनी नमाज पठण केल्याचा दावा भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला होता. त्याबाबत त्यांनी एक व्हिडीओ X पोस्ट केला आणि त्यानंतर शनिवार वाडा परिसरात मोठं आंदोलन केल. मेधा कुलकर्णी यांच्यासह पतीत पावन संघटना आणि इतर हिदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्त्यांनी आधी शनिवार वाडा परिसरात गोमुत्र शिंपडून हे आंदोलन केले. मेधा कुलकर्णी यांच्या आंदोलनानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने आक्रमक भूमिका घेत कुलकर्णी यांच्या विरोधात मोर्चा उघडला आहे.



**रुपाली पाटील शनिवार वाड्यात दाखल -** दरम्यान, आता थोड्यावेळापूर्वीच पुण्यातील शनिवारवाड्यात राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील दाखल झाल्या आहेत. त्यांनी मेधा कुलकर्णींना टार्गेट करत त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. दरम्यान, आमचा संघर्ष भाजपशी नाही. शनिवारवाडा मेधा कुलकर्णींच्या पप्पांचा नाही. हिरव्या रंगाचा भाजपला एवढा राग का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, मेधा कुलकर्णींवर गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी रुपाली पाटलांनी केली आहे.



ठाणे पूर्व येथील निर्मलादेवी वसाहत या ठिकाणी दिवाळीनिमित्त लागलेले कंदील व करण्यात आलेली विद्युत रोशनाई परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. (छाया - मनोज सिंह)









दिवाळीचा रंगोत्सव पनवेलमध्ये!

# रांगोळी प्रदर्शन ठरलं आकर्षणाचं केंद्र

पनवेल : पनवेल शहरातील विठ्ठल खंडप्पा (व्ही.के.) विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सामाजिक संघटना आणि रंगदीप क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खास दिवाळी निमित्त भव्य रांगोळी मोफत प्रदर्शन पनवेल शहरातील सीकेपी सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. १८ ते २६ ऑॅक्टोबरपर्यंत हे प्रदर्शन सर्वसामान्यांसाठी खुले असणार आहे. माजी खा. रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उदघाटन झाले. यावेळी सीकेपी हॉलचे कार्यकारी सदस्य राजू गुप्ते यांच्यासह व्ही. के. ७५ सामाजिक मंडळाचे सर्व सदस्य तसेच रंगदीप क्रिएशनचे सर्व कलाकार सदस्य व नागरिक उपस्थित होते.

माजी खा. रामशेठ ठाकूर व्ही. के. विद्यालयात शिक्षक सेवेत असताना १९७५ साली त्यांचे विद्यार्थी असणा-या विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने या रांगोळी प्रदर्शन आयोजनासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचे उदघाटन शिक्षक ठाकूर यांच्या हस्ते करण्याचा हट्ट केला.

सामाजिक बांधिलकी या उद्देशाने काही सामाजिक कार्य करण्याचे या विद्यार्थ्यांच्या गटाने ठरविले. आतापर्यंत ५२ आदिवासी जिल्हा परिषद तसेच वस्तीगृहातील दुर्मिळ शाळांमध्ये की जिथे कुठलीही सामाजिक संस्था कार्य करण्यासाठी पोहोचत नाही अशा शाळांमध्ये जाऊन त्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार मदत करत आहेत. मोफत रांगोळी प्रदर्शन हा याच उपक्रमाचा एक भाग आहे.

सीकेपी सभागृहात आयोजित रांगोळी प्रदर्शनात गणपती – दिशा पाटील, व्हि.के. ७५ – शरयु घरत, लोकनेते रामशेठ ठाकूर – मनोज भोपी, कलावंती – योगेश्री ढमाले, कानिफनाथ महाराज – नेहा धामणकर, वात्सल्य – नेहा घरत, वैजयंती माला – प्रकाश नवाळे, दशावतार – योगेश्री ढमाले, वासुदेव बळवंत फडके – दिलीप शिगवण, हनुमान चालीसा – किर्ती,योगेश्री, साईबाबा – डॉ. अमोल सलाग्रे, देवानंद – ज्ञानेश्वर कारेकर, रतन टाटा – डॉ. दिलीप शिगवण, शिवाजी महाराज – किर्ती घरत, कामधेनु – तन्वी भोपी, हनुमान – हिमांशु भोपी, राधा कृष्ण – रत्नेश घरत, कांतारा – कशिश तिखे, संस्कार भारती – शरयु घरत यांनी अशा रांगोळ्या काढल्या आहेत.

# यंदा दिवाळी पहाट नाही, पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात

## राजन विचारे यांचा निर्णय

ठाणे (मेधा भोईटे) : दिवाळी पहाट निमित्त दरवर्षी ठाण्यातील राजकीय मंडळी सामाजिक संस्थांच्या नावाखाली राम मारुती रोड, मासुंदा तलावाजवळ, चिंतामणी चौक येथे दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करतात. यावर्षी देखील दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



***राजन विचारे यांची फेसबुक वरील पोस्ट***

*मदत नव्हे कर्तव्य; धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण*

*चला, या दिवाळीत माणुसकीचा एक दिवा बळीराजासाठी, शेतकऱ्यांसाठी, पूरग्रस्तांसाठी लावूया!*

*यंदाची दिवाळी पहाट रद्द करून शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात देणार*

*एकीकडे दिवाळीचा सण साजरा करणार पण दुसरीकडे आपला बळीराजा व अन्नदाता पुराच्या पाण्यामुळे संकटात आहे. या कठीण काळात त्यांना थोडा आधार देण्यासाठी, आम्ही पूरग्रस्त भागात जाऊन मदत केली आणि करणार आहोत.*

*यंदा आपण दिवाळी पहाट साजरी न करता ज्यांना जमेल त्यांनी पुढे येऊन, मराठवाड्यात जाऊन सढळ हाताने त्यांना मदत करणार आहोत. तुमची छोटीशी मदतही त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणू शकते.*

■ या दिवाळी पहाट कार्यक्रमात तरुणांना आकर्षित करण्यासाठी चढाओढ सुरु असते. परंतु, यंदा या भागात दरवर्षी होणारा एक कार्यक्रम रद्द झाला आहे. महाराष्ट्रात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली. या पूरपरिस्थितीत शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. माणुसकीच्या नात्याने त्यांना मदतीचा हात मिळावा यासाठी ठाण्यातील एका पक्षाने दिवाळी पहाट साजरी न करण्याचा निर्णय घेतला.

■ मुंबई, ठाणे तसेच उपनगरात दिवाळीच्या पहिल्या दिवशी दिवाळी पहाट साजरी केली जाते. ठाणे शहरात गेले वर्षानुवर्ष दिवाळी पहाट निमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ठाणे शहरात दोन्ही शिवसेना आणि भाजपकडून विविध संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी मासुंदा तलाव आणि राम मारुती रोड परिसरात या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ध्वनीक्षेपकावर तसेच बँडवर गाणी वाजवून येथे उत्सव साजरा केला जात असल्याने ठाणे जिल्ह्यातील विविध भागातून हजारो तरुण -तरुणी दिवाळी पहाट निमित्ताने येत असतात. मासुंदा तलाव, चिंतामणी चौक, राम मारुती रोड, गडकरी चौकात मोठ्याप्रमाणात गर्दी होते.

*“ मासुंदा तलाव परिसरातील राजवंत ज्वेलर्स दुकानासमोरील भागात शिवसेना शिंदे गटाकडून एका संस्थेच्या माध्यमातून दिवाळी पहाटचे आयोजन केले आहे. या दिवाळी पहाटच्या कार्यक्रमात सिनेसृष्टीतील कलाकार दरवर्षी भेट देतात. तर राम मारूती रोड परिसरात भाजपचे पदाधिकारी संजय वाघुले यांनी विश्वास सामाजिक संस्थेच्या माध्यमातून बाळकूम येथील राष्ट्रीय ब्रास बँड वादनाचे आयोजन करण्यात आले आहे. ठाण्याच्या माजी महापौर तसेच शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या प्रमुख मिनाक्षी शिंदे यांच्याकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही चिंतामणी चौकात दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या दिवाळी पहाट कार्यक्रमात गायक साजन बेंद्रे आणि डीजे नेश यांचा सहभाग असणार आहे. तर, ठाकरे गट आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून गडकरी रंगायतन चौकात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजित केला जातो. यंदाही ठाकरे गटाने पोलिसांकडून कार्यक्रमासाठी परवानगी घेतली असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले होते. परंतु, दिवाळी पहाट च्या पूर्वसंध्येला राजन विचारे यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर यंदा दिवाळी पहाट चा कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले.*



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते

# ‘दैनिक किल्ले रायगड’च्या ५९ व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन

पनवेल : ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर संपादित दैनिक किल्ले रायगडच्या ५९ व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज संपन्न झाले. या प्रसंगी त्यांच्यासोबत सहसंपादक प्रदीप वालेकर, व्यवस्थापक तुषार तटकरी, सा. रायगड प्रभातचे संपादक विजय पवार, प्रसिद्धी प्रमुख हरेश साठे, पत्रकार उमेश भोईर, आदी उपस्थित होते.

या प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दैनिक किल्ले रायगडचा दिवाळी विशेषांक दरवर्षी वजनदार लेखकांच्या लेखणीतून साकारत असल्याचे अधोरेखित केले. यंदाचाही अंक परिपूर्ण व दर्जेदार झाल्याची पावती त्यांनी किल्ले रायगडच्या टीमला दिली.दर्जेदार साहित्यातूनच उत्कृष्ट अंकांची निर्मिती होत असते. त्या परंपरेला वृद्धिंगत आणि टिकवून ठेवण्यासाठी किल्ले रायगडच्या संपादकीय टीमने घेतलेली अपार मेहनत या अंकातून स्पष्ट जाणवते, असे मत लोकनेते ठाकूर यांनी व्यक्त केले. स्वर्गीय ल. पा. वालेकर हे पत्रकारिता क्षेत्रातील आधारस्तंभ होते, त्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम त्यांचे कुटुंबीय करीत आहेत असे सांगतानाच किल्ले रायगड साहित्यिकांची परंपरा महाराष्ट्रभर मांडण्याचे काम करीत असल्याचे गौरवोदगारही त्यांनी यावेळी काढले. या विशेषांकामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि समकालीन विषयांवर विविध मान्यवर लेखकांचे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. दरवर्षीप्रमाणेच यंदाचा अंकही वाचकांना विचारप्रवृत्त, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरणार आहे, असा विश्वास किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांनी व्यक्त केला.

# गायमुख ते कल्याण फाटापर्यंत ठाणे पालिकेने सोमवारी राबवली सर्वंकष स्वच्छता मोहीम

ठाणे : दिवाळीच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेतर्फे गायमुख ते कल्याण फाटा या महामार्गावर सोमवारी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.


या मोहिमेत, संपूर्ण महामार्गाची स्वीपिंग मशीनद्वारे साफसफाई करण्यात आली. त्याचवेळी या संपूर्ण पट्ट्यात एकूण ३०० सफाई कर्मचाऱ्यांच्या मदतीनेही सफाई करण्यात आल्याची माहिती उपायुक्त मनीष जोशी यांनी दिली.

या सफाई मोहिमेत एकूण तीन डंपर भरून कचरा उचलण्यात आला. या मोहिमेत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त मनीष जोशी, सहाय्यक आयुक्त सुनील मोरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक शयूराज कांबळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक मयुरी अंबाजी यांच्यासह उपमुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, सफाई कामगार सहभागी झाले होते.














‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१



PARADISE GROUP®
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
MAHARERA NO.: P52000046738
Available on maharera.maharashtra.gov.in
THIS DIWALI IT'S TIME FOR
SOUTH AFRICA
A NEW CHAPTER BEGINS
29 ACRE TOWNSHIP
WORK IN FULL SWING
STARTING FROM ₹43 LAKHS* ONWARDS
*T&C Apply
1 & 2 BHK THEMED LUXURY HOMES
HAPPY DIWALI
Artist's Impression
PROJECT HALLMARKS
Residential Cum Commercial Township
G+32 Storeyed Magnificent Towers
55,000 Sq. Ft. of Lavish Club Life
Lush Green Open Landscapes
Themed Avenues for Health, Leisure and Recreation
SAI SUN CITY
UPPER KHARGHAR
LOCATION ADVANTAGES: Pendhar Metro & Taloja Railway Station - 7 Mins | Mumbai Pune-Expressway & Kalyan-Shilphata Road Nearby | Navi Mumbai International Airport - 30 Mins | Central Park, ISKCON Temple & Golf Course - 15 Mins | Next BKC - 15 Mins | MTHL (Atal Setu) in Close Proximity | KTLR - 12 Mins
All Prime Education, Entertainment & Healthcare in 3 Kms Radius
98330 90000
Email: enquiry@paradisegroup.co.in | www.paradisegroup.co.in
Site & Sales Office: Sai Sun City, Ghot, Tal. Panvel
Disclaimer: All the specifcation, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.